RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४




विशेष आकर्षण : नामवंत सिने कलाकार उपस्थित राहणार

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -७

## २०० दिवस पूर्ण... शंभू बॉर्डरवर शेतकरी मोठ्या आंदोलनाच्या तयारीत; विनेश फोगाट सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ नवी दिल्ली**

शंभू बॉर्डरवर अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाला शनिवारी २०० दिवस पूर्ण झाले. शंभू बॉर्डरवर आंदोलनाला २०० दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शेतकरी मोठ्या संख्येने जमले असून आणखी मोठं आंदोलन करण्याचं नियोजन करत आहे. शेतकऱ्यांच्या या आंदोलनात महिला कुस्तीपटू विनेश फोगाटही सहभागी झाली आहे.



शेतकऱ्यांच्या या मोठ्या आंदोलनात विनेश फोगाटचा शेतकऱ्यांकडून गौरव करण्यात आला आहे. आंदोलन शांततेत पण तीव्रतेने सुरू असल्याचं शेतकरी नेते सरवन सिंह पंधेर यांनी सांगितलं. केंद्र सरकार त्यांच्या संकल्पाची परीक्षा घेत असून त्यांच्या मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत, असंही ते म्हणाले.

पंधेर यांनी आज तकला सांगितलं की, आम्ही पुन्हा एकदा सरकारसमोर आमच्या मागण्या मांडू आणि नव्या घोषणाही केल्या जातील. त्याचबरोबर बॉलीवूड अभिनेत्री आणि भाजपा खासदार कंगना राणौतवर कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. त्यांनी भारतीय जनता पक्षाला कंगनाच्या विरोधात कठोर भूमिका घेण्याचं आवाहन केलं आहे. आगामी हरियाणा निवडणुकीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या रणनीतीचे खुलासे करण्याचे संकेतही दिले आहेत. राज्याच्या राजकीय पटलावर सक्रिय भूमिका बजावण्याच्या आपल्या इराद्यावर जोर देत येत्या काही दिवसांत त्यांची पुढील वाटचाल जाहीर करण्याची त्यांची योजना आहे.

पोलीस प्रशासनाने शेतकऱ्यांना दिल्लीकडे मोर्चा काढण्यापासून रोखल्यानंतर १३ फेब्रुवारीपासून शेतकरी शंभू बॉर्डरवर ठाण मांडून आहेत. आंदोलक इतर प्रमुख मुद्द्यांसह सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमत ची कायदेशीर गॅरंटी देण्याची मागणी करत आहेत.

## झारखंड, छत्तीसगडचे १६ आमदार छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल

### आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या एका रणनीतीचा भाग असल्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१छत्रपती संभाजीनगर**

झारखंड, छत्तीसगड विधनसभेतील तब्बल १६ आमदार शुक्रवारी रात्रीपासून छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झाले आहेत. हे सर्व आमदार भाजपाचे असून त्यांच्यासोबत पक्षाचे काही उच्चपदाधिकारी देखील असल्याची माहिती आहे. शहरातील दोन हॉटेलमध्ये निवास आणि बैठकीची व्यवस्था करण्यात आली आहे. दोन्ही हॉटेल बाहेर मोठा पोलिस बंदोबस्त असून ही बैठक आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या एका रणनीतीचा भाग असल्याची चर्चा आहे.

महाराष्ट्रात येत्या काही दिवसांत विधानसभा निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा मोठी रणनीती ठरवत असल्याची माहिती आहे. राज्यातील विभागवार तयारीच्या अनुषंगाने भाजपने मराठवाड्यात जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून झारखंड, छत्तीसगड येथील भाजपाचे तब्बल १६ आमदार छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवारी रात्रीपासून शनिवारी सकाळपर्यंत दाखल झाले. यावेळी छत्तीसगड भाजपाचे काही वरिष्ठ पदाधिकारी देखील त्यांच्या सोबत आहेत. शहरातील दोन मोठ्या हॉटेलमध्ये सर्वांची व्यवस्था करण्यात आली आहे. एका हॉटेलमध्ये निवास तर दुसऱ्या हॉटेलमध्ये बैठकीची व्यवस्था आहे. स्थानिक भाजपा पदाधिकारी समीर राजूरकर आणि अहमदनगर येथील प्रकाश गांधी येथील समन्वयक आहेत. आज सकाळी ११ वाजेपासून राज्यातील भाजपा पदाधिकारी आणि झारखंड, छत्तीसगडचे आमदार, पदाधिकारी यांची एक महत्वपूर्ण बैठक सुरू झाली आहे. ही बैठक आगामी विधानसभेच्या तयारीचा भाग असल्याची माहिती आहे.



**मराठवाड्यातील २५ जागांवर लक्ष**

भाजपाने मराठवाड्यातील विधानसभेच्या २५ जागांवर लक्ष केंद्रित केले आहे. या जागांवर विजय कसा मिळवायचा यावरच या बैठकीत खल होणार आहे. बैठकीत उपस्थित झारखंड, छत्तीसगडमधील आमदार आणि भाजपा पदाधिकारी यांना या मतदारसंघांची जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती आहे. तसेच उद्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शहरात असून त्यांच्यासोबत देखील या सर्वांची बैठक होणार असल्याची सुत्रांची माहिती आहे.

## 'लाडकी बहिण' रोखण्यासाठी पटोले, केदार, ठाकरेंशी जवळिक असलेले वडपल्लीवार कोर्टात गेले

### देवेंद्र फडणवीस यांनी डागली तोफ : देवा भाऊ असे पर्यंत हायकोर्टात स्थगिती येऊ देणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

काही लोक म्हणत आहेत की लाकडी बहीण योजना सुरू ठेवू नका. मी कागद घेऊन आलो. ही यजोना बंद व्हावी म्हणून काँग्रेसचे अनिल वडपल्लीवार हायकोर्टात गेले आहेत. हे तेच आहेत जे काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले व आ. विकास ठाकरे यांचे निवडणूक प्रमुख होते. माजी मंत्री सुनील केदार यांचे राईट हॅण्ड म्हणून ओळखले जातात. त्यामुळे यांची नियत ओळखा. पण मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सांगतो, देवा भाऊ असे पर्यंत हायकोर्टात मोठा वकील उभा करू, काहिही झाले तरी या योजनेवर स्थगिती येऊ देणार नाही, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना सुरू राहणार असे आश्वस्त केले.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना टप्पा दोन निधी वितरण सोहळा शनिवारी नागपुरात पार पडला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर तोफ डागली. ते म्हणाले, ही योजना रोखण्यासाठी विरोधक पहिल्यांदा मुंबईच्या न्यायालयात गेले. तेथे जमले नाही. आता नागपूरच्या न्यायालयात गेले. याची नियत समजून घ्या. नागपुरात दुसऱ्या टप्प्यात ५० लाख खात्यांमध्ये पैसे दिले आहेत. १ कोटी ६० लाख भगिनींच्या खात्यात प्रत्येकी ३ हजार रुपये जमा केले आहेत. १० टक्के महिलांनाही पैसे मिळणार नाही अशी वल्गना महाविकास आघाडीचे नेते करीत होते. त्यांना आव्हान आहे की या महिलांना पैसे मिळाले की नाही ते विचारा.

लाडक्या बहिणींनो मला सांगा या ठिकाण योजना आणून चूक केली का, ही योजने सुरू ठेवायची आहे ना, मुलींना मोफत शिक्षण सुरू ठेवायची आहे ना, महिलांना एसटीत पन्नास टक्के सवलत दिली, या योजना सुरू ठेवायच्या आहेत ना, मग आम्हाला आशिर्वाद द्या, असे आवाहन त्यांनी केले. ५०७ अभ्यासक्रमांसाठी मुलींच्या शिक्षणाची फी त्यांचे लाडके भाऊ भरणार आहेत. महिला या वस्तू नाहीत. त्या माता, भगिनी आहेत. ही शिकवण मुलांना द्यावी लागेल. ते महिलांच्या विरुद्ध अपराध करतील त्यांना मोकळे सोडले जाणार नाही, असा विश्वासही फडणवीस यांनी दिला.

## बाबा रामदेव पुन्हा अडचणीत, दिव्य दंत मंजनमध्ये मांसाहारी घटक असल्याचा दावा! न्यायालयानं बजावली नोटिस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नवीदिल्ली**

बाबा रामदेव यांच्या पतंजली कंपनीचे उत्पादन असलेल्या दिव्या दंत मंजनमध्ये मांसाहारी घटक असल्याचा दावा करण्यात आला आहे. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. न्यायालयाने ही याचिका स्वीकारली असून केंद्र सरकार, पतंजली, पतंजलीचे दिव्य फार्मेसी, बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण आदींना नोटीसही बजावून उत्तर मागवले आहे.



संबंधित याचिकेत म्हणण्यात आले आहे की, दिव्या दंत मंजन हे शाकाहारी असल्याचे सांगत बाजारात विकले जाते. मात्र त्यात माशांच्या घटकांचा समावेश आहे. अधिवक्ता यतीन शर्मा यांनी ही याचिका दाखल केली आहे. यात, कंपनी आपल्या 'दिव्य दंत मंजन'मध्ये 'समुद्र फेन' (कटलफिश) नामक मांसाहारी पदार्थ वापरते, असे म्हणण्यात आले आहे.याचिकाकर्त्यांने म्हटले आहे की, त्यांनी यासंदर्भात दिल्ली पोलीस, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, FSSAI, केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्था आणि आयुष मंत्रालयाकडे अनेकदा तक्रार केली. मात्र, कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही.

## सावत्र भावांना धडा शिकवा; लाडक्या बहिणीला ओवाळणीची रक्कम वाढवू

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा : निवडणुकीत महायुतीला आशिर्वाद देण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नागपूर**

महायुती सरकारने लाडक्या बहिणीला रक्षा बंधनाला पैसे दिले, भाऊ बिजेला पण दिले जातील. हा माहेरचा आहेर आहे. ही योजना बंद होणार नाही. तुम्ही सरकारची ताकद वाढविली हात आखडता घेणार नाही. फक्त दीड हजारावर थांबणार नाही. ते दोन हजार, अडीच हजार, तीन हजार होतील. लाडकी बहिणीला ओवाळणीची रक्कम वाढवत जावू, असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भविष्यात लाडकी बहिण योजनेच्या निधीत वाढ करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना टप्पा दोन निधी वितरण सोहळा शनिवारी नागपुरात पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, तिजोरीतील पैसे सर्वसामान्य लोकांचे आहेत. माझ्या बहिणींचे आहेत. त्याचा वापर सर्वसामान्यांसाठी करू. करोडो बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून सरकार म्हणून आनंद मिळत आहे. ही अर्थव्यवस्थेला चालना देणारी योजना आहे. रक्षाबंधनच्या दोन दिवस अगोदर पैसे जातील असा शब्द दिला होता. तो पाळला.

## ज्यादिवशी लोक मला घरी पाठवतील, त्यादिवशी...; फडणवीसांनी सांगितला प्लॅन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ मुंबई**

राज्याच्या राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप करताना भाषेचा स्तर खालावला आहे. या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खंत व्यक्त केली. मला विष पचवायची सवय आहे, असे सांगताना फडणवीसांनी त्यांच्या राजकारणामागची भूमिका स्पष्ट केली.

एका मुलाखतीत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी राजकारणात जेव्हा आलो, त्यावेळी एकच गोष्ट शिकलो की, राजकारणात तुमच्याकडे संयम असला पाहिजे. शिव्या ऐकण्याची सवय असली पाहिजे. तुम्हाला विष पचवता आले पाहिजे. आता तर गेली दोन वर्षे तुम्ही बघतच आहात. मी किती विष पचवतो. त्यामुळे विष पचवण्याची देखील सवय मला आहे, असे मिश्कील विधान फडणवीसांनी केले.




पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, हे सगळे करून मला असे वाटते की, शेवटी आपले ध्येय काय आहे. राजकारणात पदे भोगण्या करता आलेलो नाही. संपत्ती तयार करण्यासाठी आलो नाही. २५ वर्षे महाराष्ट्राच्या विधानसभेत आहे. कुठलीही शाळा उघडली नाही. कॉलेज उघडले नाही. साखर कारखाना उघडला नाही. सुतगिरणी उघडली नाही. कुठलेही स्वतः करिता वैयक्तिक साम्राज्य तयार केले नाही. केवळ आणि केवळ जी काही जनतेची सेवा करता येईल, ती करण्या करिता इथे आहे.

**फडणवीस म्हणाले, मला धंदाच नाहीये**

माझे स्टेक्स (भागभांडवल) काहीच नाहीत. अनेक लोकांना राजकारण या करिता टिकवायचे असते की, राजकारणामुळे त्यांचा धंदा टिकतो. मला धंदाच नाहीये. त्यामुळे मला ज्यादिवशी लोक घरी पाठवतील, त्यादिवशी शांतपणे घरी जाईन, असे भाष्य फडणवीस यांनी केले.



## संपादकीय ......

# ‘लाडक्या बहिणी’ ची सुरक्षा ही महत्वाची

महाराष्ट्रात आणि राज्यातही महिला अत्याचार वाढत असताना राखी पौर्णिमेनिमित्त बहिणींचे संरक्षण करण्याचे बंधन संबंधित यंत्रणांसाठी महत्त्वाचे आहे. कोलकात्यापाठोपाठ डेहराडूनमध्ये आयएसबीटी बसमध्ये अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचाराची बातमी आली. अमरावती सह देशात सातत्याने महिला अत्याचाराच्या घटना घडत असताना ‘लाडक्या बहिणी’च्या सुरक्षिततेचाही प्रश्नही महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रात सध्या जातीय आणि धार्मिक मुद्दे राजकारणाच्या केंद्रस्थानी आहेत. या धार्मिक आणि जातीय विषयांच्या ‘प्रचारकी’ धुरळ्यात विधानसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही अगदी अलिकडेच झालेल्या महिला अत्याचार आणि हत्येच्या घटनांचे विस्मरण व्हायला नको. तसेच निवडणुकांसाठीचे उपयोग मूल्य म्हणून या घटनांना जातीय किंवा धार्मिक चष्म्यातून पाहिले जाणे राजकारणासाठी जरी फायद्याचे ठरत असले तरी समाजकारणासाठी ते धोक्याचेच ठरणार आहे.लाडकी बहीण योजनेतून बहिणींच्या खात्यात ३० अब्ज ९० कोटी रुपये जमा केल्याची बातमी बहिणींसाठी आनंदाची आहे, परंतु असे होत असताना देश आणि राज्यातील बहिणींच्या सुरक्षेची जबाबदारीही सुरक्षा, सरकारी, तपास यंत्रणेतील ‘भावांनी’ घ्यायला हवी. यासोबतच या देशाच्या नागरिक असलेल्या भावांनीही ‘लाडक्या बहिणीं’ना संविधानाला अभिप्रेत असलेल्या प्रतिष्ठेने जगण्याच्या हमीचेही संरक्षण करायला हवे. अलिकडच्या काळात महिला अत्याचाराच्या महाराष्ट्रात घडलेल्या घटना सामाजिक चिंतेचा विषय झाल्या आहेत. यात बेकायदा गर्भलिंग निदानापासून ते स्त्री भ्रूणहत्या, ऑनर किलिंग, बलात्कार, मानवी तस्करी, कौटुंबिक हिंसाचार, समुपदेशनाचा अभाव, महिलांचे मानसिक आरोग्य, हुंडाबळी, अंधश्रद्धेतून जाणारे महिलांचे बळी, महिलांच्या वाढलेल्या आत्महत्यांमागील कारणे, जातीय अत्याचार, छायाचित्रे किंवा व्हिडीओ सार्वजनिक करण्याची भीती घालून मानहानीची धमकी आदी अनेक गुन्हे आहेत.केंद्रीय गृह विभागाने महाराष्ट्र राज्यातून बेपत्ता झालेल्या मुली आणि महिलांची आकडेवारी उपलब्ध केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात वर्ष २०१९ मध्ये ३५९०० तसेच वर्ष २०२० मध्ये ३००८९ आणि वर्ष २०२१ मध्ये ३४६६३ मुली आणि महिला बेपत्ता झाल्या आहेत. या बेपत्ता महिला किंवा मुलींमागे मानवी तस्करी, कथित लव्ह जिहाद, ऑनर किलिंग किंवा इतर कारणांची माहिती घ्यायला हवी. रोजच्या बातम्यांमध्ये फूस लावून अल्पवयीन मुली तसेच सज्ञान महिला मुलींना पळवून नेल्याच्या बातम्या असतात. यातील ही बाजूही सामाजिक दृष्टीकोनातून समोर यायला हवी.

महाराष्ट्रातील बेपत्ता महिला आणि मुलींची संबंधित आकडेवारी ही नोंद प्रकरणांची असल्याने जी प्रकरणे नोंद झालेली नाहीत, त्यांची संख्या यात नसल्याचे स्पष्ट व्हावे. अशी कित्येक प्रकरणे नोंद होत नाहीत, त्यामागील कारणांचीही दखल घ्यायला हवी, कित्येक प्रकरणात सामाजिक बदनामीची भीती कारण असते. अनेक प्रकरणातील आरोपी हे धनाढ्य किंवा समाजावर प्रभाव टाकणारे असल्याने त्यांच्या दबावाखाली कमकुवत गटातील पीडितांना माघार घ्यावी लागते. मागील वर्षाच्या सुरुवातीपासून ते पहिल्या पाच महिन्यात राज्यात जवळपास साडेपाच हजार मुली, महिला बेपत्ता झाल्याची माहिती गेल्या वर्षी विधानसभेत देण्यात आली होती. यावर सत्ताधार्यांनी हा प्रश्न राष्ट्रीय स्तरावरील असल्याचे सांगितले, मात्र यातून मार्ग काढण्यासाठी किंवा या प्रकरणांचा छडा लावण्यासाठी आवश्यक उपाययोजनांविषयी उहापोह केला नाही. ही गृहीत धरण्याची वृत्ती सोडून त्याविषयी गांभीर्य बाळगायला हवे.लाडक्या बहिणींच्या रक्षणाची जबाबदारी सरकार, पोलीस आणि तपास यंत्रणांनी घ्यायला हवीच, त्यासोबत बहिणींना कुठला धोका पोहचणार नाही, याची काळजीही प्रत्येक नागरिक मानल्या जाणार्या भावाने घ्यायला हवी. संविधान प्रास्ताविकातून नागरिकत्व बहाल करताना स्त्री, पुरुष किंवा तृतीयपंथी असा उल्लेख करत नाहीत तर व्यक्ती असा केला जातो. कुठलीही महिला ही पहिल्यांदा या दृष्टीने व्यक्ती म्हणून ओळखली जाते. जातीय, धार्मिक, राजकीय ओळख त्यानंतर गरजेनुसार व्यक्तीशी जोडली जाते. लाडक्या बहिणींच्या संरक्षणासाठी सरकारी, प्रशासकीय यंत्रणेतल्या भावांनी बहिणींना आर्थिक मदत देऊन तिला मदत जरूर करावी, मात्र असे करताना तिच्या संरक्षणाची मूलभूत जबाबदारी आपल्यावर असल्याचेही विसरता कामा नये, कारण महिन्याला दीड हजार रुपयांची आर्थिक मदत आज ना उद्या सरकार बदलू शकेल. त्यात कमी जास्त प्रमाण होऊ शकेल. तिचे स्वरुप बदलू शकेल. प्रसंगी सरकारेही बदलतील, परंतु राज्यातील बहिणींच्या रक्षणातून कुठल्याच सरकारला हात झटकता येणार नाहीत.

# लोकशाहीच्या दिशेने एक भक्कम पाऊल ?

आपल्या देशात संविधान लागू होऊन पंचाहत्तर वर्षे झाली आहेत. यानिमित्ताने देशभरात संविधान अमृत महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. याशिवाय संविधानाबाबत पसरवलेला संभ्रम आणि अफवा दूर करण्यासाठी व्यापक जनसंपर्कही करण्यात येणार आहे. संविधान जागर समितीने आपला कृती आराखडा तयार केला असून त्यानुसार भविष्यात मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यातील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे 'संविधान जागर यात्रा २०२४'. बाबा साहेब आंबेडकरांच्या संकल्पनेला अनुसरून भारतीय राज्यघटना आणि लोकशाही मूल्यांबद्दल सर्वसामान्य जनतेशी संवाद साधून राष्ट्रीय समाजाची निर्मिती करणे आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि बंधुत्वाची जाणीव निर्माण करून संविधानप्रेमी समाज निर्माण करणे हा यात्रेचा उद्देश होता. न्याय , ते बनवावे लागेल. चला तर मग संविधान जागर यात्रेत सहभागी होऊया. आत्तापर्यंत संविधान जागर यात्रेने महाराष्ट्रातील २० हून अधिक जिल्ह्यांचा दौरा केला आहे. भारतीय राज्यघटनेबद्दल महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्यानागरिकांशी भेदभाव केला जाऊ शकत नाही: भारतीय राज्यघटना देशातील प्रत्येक नागरिकाला एकल नागरिकत्व प्रदान करते. उदाहरणार्थ, भारतातील कोणत्याही राज्यातील रहिवासी दुसऱ्या राज्यातील रहिवाशाशी भेदभाव करू शकत नाही. देशातील प्रत्येक नागरिकाला भारताच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात जाण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्याला कोणीही रोखू



शकत नाही. समाजात संभ्रम निर्माण करण्यासाठी काही पक्ष संविधान धोक्यात असल्याची चुकीची माहिती पसरवत आहेत.मात्र तसे काहीही नाही आरक्षण बंद होणार, मनुस्मृती संविधानाची जागा घेणार अशा अफवा पसरवून अनुसूचित जाती-जमातींची दिशाभूल केली जात आहे. संविधानाबाबतचे गैरसमज आणि अफवा दूर करण्यासाठी संविधान जागृती समितीची स्थापना करण्यात आली आहे.संविधान अमृत महोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येणार असून, संविधानाबाबतचे गैरसमज आणि अफवा दूर करण्यासाठी व्यापक जनसंपर्काचे प्रयत्न केले जातील. 'संविधान जागर यात्रा २०२४' चा उद्देश भारतीय राज्यघटना आणि लोकशाही मूल्यांबद्दल सामान्य लोकांशी संवाद साधणे आणि संविधानाचा आदर करणारा समाज निर्माण करणे हा आहे. काही व्यक्ती राज्यघटनेबद्दल चुकीची माहिती पसरवत आहेत आणि जातीवादाला प्रोत्साहन देत आहेत, हे केवळ राजकीयच नाही तर आंतरराष्ट्रीय षडयंत्रही आहे. संविधान जागर समितीने संविधान जागर यात्रा २०२४ चे आयोजन केले आहे, जी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून फिरत आहे.यात्रेत विविध प्रेरणादायी सामाजिक केंद्रांचा समावेश होणार असून जिल्हा मुख्यालयात जाहीर सभा होणार आहेत. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनांचे अनुसरण करून एक राष्ट्रीय समाज निर्माण करणे आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय याबद्दल जागरूकता वाढवणे हा या प्रवासाचा उद्देश आहे. संविधान जागर यात्रेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू राजेंद्र गायकवाड आणि वाल्मिक निकाळजे सहभागी झाले होते.आकाश अंभोरे, योजना ठोकळे, स्नेहा भालेराव आदी मान्यवर या यात्रेसाठी महाराष्ट्रभर फिरत आहेत.माजी समाजकल्याण मंत्री राजकुमार बडोले, कश्यप साळुंके, धरमपाल मेश्राम, मिलिंद इनामदार यांचाही या यात्रेत समावेश आहे.आपल्या देशात राज्यघटना लागू होऊन पंचाहत्तर वर्षे झाली, पण सर्वसामान्य नागरिकांना ती खऱ्या अर्थाने समजू शकलेली नाही. संविधान जागर समितीच्या वतीने आयोजित संविधान जागर यात्रेच्या माध्यमातून संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रहिताचा विचार प्रत्येक घराघरात पोहोचवला जात आहे. समाजात जाणीवपूर्वक निर्माण केलेला संभ्रम, गैरसमज आणि अफवा दूर करण्यासाठी या संविधान जागर यात्रेची मदत होत आहे.आत्तापर्यंत संविधान जागर यात्रेने महाराष्ट्रातील २० हून अधिक जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत.

# आले पिकाच्या अधिक उत्पादनासाठी करा ह्या पद्धतीचा अवलंब

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रात प्रामुख्याने आल्याच्या माहीम या स्थानिक नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाणाची लागवड केली जाते. याशिवाय रियो दि जेनेरो, चिनी, जमैका, जपानी, कोचीन, सुरुची, सुरभी, सुप्रभात, वासयनाड, मारन या सुधारित जाती आहेत.

**पूर्वतयारी**

– हेक्टरी १५०० ते १८०० किलो बेणे लागते.

– जमीन १५ ते २० सेंटीमीटर खोल नांगरून, ढेकळे फोडून भुसभुशीत करावी.

– जमीन तयार करताना शेणखत किंवा कंपोस्ट खत २५ ते ३० टन प्रति हेक्टरी द्यावे.

**कंद निवड**

– सुधारित पद्धतीने लागवड केल्यास हेक्टरी १० ते १५ टन उत्पादन मिळते.

– शेतात मूळ कुजव्या रोग असेल अशा शेतातील कंद लागवडीसाठी वापरू नयेत.

– आल्याची लागवड फुगलेल्या डोळ्यांच्या बोटांपासून करतात.


– अंदाजे २५ ते ३० ग्रॅम वजनाचे बोट (तुकडे/कुडी) रोगविरहित साठवणीतून काढलेले लागवडीसाठी वापरतात. त्यावर १ ते २ रसरशीत डोळे असावेत.

**लागवड**

– आल्याची लागवड सपाट वाफ्यावर, रुंद वरंबा पद्धत किंवा सरी पद्धतीने करतात.

– मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लागवड केल्यास उत्पादनात वाढ होते.

– जमीन हलकी असल्यास तीन



आले पिकासाठी सोप्या टिप्स

बाय २ मीटरचे सपाट वाफे करावेत.

– मध्यम व भारी जमिनीत सरी वरंबे तयार करावेत.

– वरंबे तयार करताना दोन वरंब्यामधील अंतर ६० सेंटीमीटर ठेवावे. २० सेंटीमीटर उंचीचे व तीन मीटर लांबीचे व एक मीटर रुंदीचे गादी वाफे करावेत.

**खत व्यवस्थापन**

– अधिक उत्पादनासाठी हेक्टरी २५ ते ३० टन कुजलेले शेणखत लागवडीपूर्वी द्यावे.

– आल्याच्या पिकाला हेक्टरी ७५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश प्रति हेक्टरी रासायनिक खताच्या स्वरूपात द्यावे.

– आल्याची लागवड करताना नत्राचा निम्मा हप्ता म्हणजेच ३७.५ किलो, ५० किलो स्फुरद व २५ किलो पालाश जमिनीत मिसळावे.

– लागवडीनंतर ४० दिवसांनी निम्मे नत्र म्हणजेच ३७.५ किलो प्रति हेक्टरी द्यावे.

– या नत्राच्या हप्त्यानंतर ३० दिवसांनी तणाचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.

**पाणी व्यवस्थापन व पिक संरक्षण**

– आले लागवड केल्यानंतर पाणी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

– पावसाळा संपल्यानंतर ६ ते ८ दिवसांनी पाणी दिले पाहिजे.

– जमिनीत पाणी साचल्याने मूळ कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होतो.

– रोगग्रस्त आले दिसताच काढून नष्ट करावे.

– कंदमाशीच्या नियंत्रणासाठी लागवडीपूर्वी बीजप्रक्रिया करावी.

– निरोगी कंदाची लागवड करावी.

**काढणी व उत्पादन**

– ओल्या आल्यासाठी लागवडीनंतर ६ ते ८ महिन्यांनी पाने पिवळी पडल्यानंतर किंवा वाळल्यानंतर पीक काढणीसाठी तयार होते.

– सुंठ करण्यासाठी पाला वाळून खाली पडल्यावर म्हणजे २१० ते २२० दिवसांनी काढणी करावी.




## एक्स्पायरी डेट निघून गेलेले दूध प्यावे की नाही ?

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्यापैकी अनेक जण आधी एक्स्पायरी डेट बघतात आणि मगच अन्नपदार्थ खातात. परंतु कधीकधी चुकून एखादा पदार्थ एक्स्पायरी डेट न पाहता खाल्ला गेला तर मात्र काळजी वाटू लागते. की काही गडबड तर होणार नाही ना? जर पाकिटवालं दूध असेल तर त्यावर त्याची एक्सपायरी डेट लिहिलेली असते. कधीकधी ही एक्स्पायरी डेट निघून जाते आणि आपल्याला प्रश्न पडतो की एक्स्पायरी डेट निघून गेलेले दूध प्यावे की नाही ? की ते कुत्रा-मांजरीला खायला द्यावे? एक्स्पर्टसच्या म्हणण्यानुसार, एक्स्पायरी डेट निघून गेल्यानंतर एक किंवा दोन दिवसांनी असे अन्नपदार्थ खाल्ले तर फार नुकसान होत नाही. परंतु काही केसेसमध्ये मोठमोठे आजार झाले असल्याचंही लक्षात आलंय. त्यामुळे खाल्ल्यानंतर ताबडतोब काहीच झालं नाही पण भविष्यात काही झालं तर ? असाही प्रश्न कधीकधी पडतो.

बरेच लोक ठरवू शकत नाहीत की पाकिटवालं दूध फेकावं की वापरावं? यावर फूड एक्सपर्टस म्हणतात, काहीवेळेस एक्स्पायरी डेट उलटल्यानंतर एकदोन दिवसांपर्यंत दूध पिणे वाईट नाही. पण हे ऋतूवर अवलंबून आहे. जर तुम्ही हिवाळ्यात एक्स्पायरी डेटनंतर दूध वापरत असाल तर असं होऊ शकतं की दूध फाटणार नाही. जर दूध फाटलं नसेल तर तुम्ही हे दूध पिऊ शकता. पण जर दूध फाटलं असेल तर त्याला फेकून देणंच योग्य राहिल.

एका फूड एक्सपर्टच्या म्हणण्यानुसार, अन्नपदार्थ एक्स्पायरी डेटच्या एक-दोन दिवसांनंतर खाल्ल्याने काही समस्या निर्माण होत नाही. यामुळेच कंपन्या एकदोन दिवस आधीचीच डेट लिहितात जेणेकरुन ग्राहक सतर्क राहू शकतील. काही बाबतीत अन्नपदार्थांवर लिहिण्यात आलेली एक्स्पायरी डेट गोंधळवून टाकणारी असू शकते.एक्स्पायरी डेट पार करुनही जर दूध फाटलं नसेल तरीसुद्धा तुम्ही हे दूध तुमच्या मुलांना देऊ नका. या दुधामुळे मुलांच्या शरीरात हानिकारक



बॅक्टेरिया निर्माण होऊ शकतात. यामुळे उलटी, ताप असे आजार होऊ शकतात. जर तुम्ही कुत्रा-मांजरीला हे दूध द्यायचं म्हणत असाल तर त्याचेही साईड इफेक्टस असू शकतात.साधारणपणे, खाद्यपदार्थांवर तीन प्रकारच्या तारखा लिहिलेल्या असतात. यात बेस्ट इफ युज बाय डेट, द सेल बाय डेट आणि युज बाय डेट अशा तारखांचा समावेश असतो. यावरुन माहिती मिळते की तुम्ही तो खाद्यपदार्थ कधीपर्यंत खाऊ शकता. जर तुम्ही बेस्ट बीफोर किंवा एक्स्पायरी डेट उलटल्यानंतर काही दिवस अन्नपदार्थांचं सेवन करत असाल तर तुम्हाला काही होणार नाही. पण दुसऱ्या प्रोडक्टच्या तुलनेत दुधाच्या बाबतीत सावधागिरी बाळगणं गरजेचं आहे.

# राज्य नाट्य स्पर्धेच्या प्रवेशिका सादर करण्याकरीता मुदतवाढ देण्यास, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३१ अमरावती** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या, राज्य नाट्य स्पर्धेतील प्रवेशिका सादर करण्यास ५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य नाट्य स्पर्धेतील हौशी मराठी, हिंदी, संस्कृत, संगीत, बालनाट्य व दिव्यांग बालनाट्य या वर्गवारीसाठी प्रवेशिका सादर करण्याचा अंतिम दिनांक २६ ऑगस्ट हा होता. मात्र काही नाट्यसंस्था व संघटनांनी या प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केलेली होती. जास्तीत जास्त संघाना या स्पर्धेत भाग घेता यावा यासाठी, प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करून; सांस्कृतिक कार्य



मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रवेशिका सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी अशी सूचना सांस्कृतिक कार्य संचालनालयास केली होती. या सूचनेच्या अनुषंगाने प्रवेशिका सादर करण्यास दिनांक ५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे. या मुदतवाढ निर्णयाच्या अनुषंगाने, राज्य नाट्य स्पर्धेतील हौशी मराठी, हिंदी, संस्कृत, संगीत, दिव्यांग बालनाट्य, बालनाट्य या स्पर्धेत भाग घेण्यास इच्छुक असलेले संघ, ऑनलाइन पद्धतीने दिनांक ५ सप्टेंबर पर्यंत प्रवेशिका सादर करू शकतील असे प्रसिद्धीपत्रक सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रसिद्ध केले आहे.

# अमरावतीच्या जिल्हा माहिती अधिकारीपदी गजानन कोटुरवार रुजू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती–** जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती येथील जिल्हा माहिती अधिकारी या पदावर गजानन शेषराव कोटुरवार आज रुजू झाले आहेत. जिल्हा माहिती अधिकारी या पदावर त्यांची प्रशासकीय बदली झाली असून त्यांनी आज दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी माहिती अधिकारी श्रीमती अपर्णा यावलकर यांच्याकडून जिल्हा माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार स्वीकारला. माहिती अधिकारी श्रीमती अपर्णा यावलकर, माहिती सहायक सतिश बगमारे, वरीष्ठ लिपीक प्रतिक फुलाडी, योगेश गावंडे, छायाचित्रकार सागर राणे,



कनिष्ठ लिपीक गजानन परटके, कोमल भगत, वाहनचालक हर्षल हाडे, शिपाई राजश्री चौरपगार, प्रतिक वानखडे आदी यावेळी उपस्थित होते.जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी यापूर्वी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मुंबई व जिल्हा माहिती कार्यालय, यवतमाळ येथे उपसंपादक पदावर तसेच विभागीय माहिती कार्यालय, अमरावती येथे सहायक संचालक तर जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा येथे जिल्हा माहिती अधिकारी या पदावर काम केले आहे. या कालावधीत अनेक वैशिष्ट्यपूर्ण शासकीय उपक्रम राबवून त्यांनी योगदान दिले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# नवनीत राणा यांचा अचलपूर जिल्हा निर्मितीचा संकल्प

## धारणी येथे युवा स्वाभिमानच्या दहीहांडीला उसळली प्रचंड गर्दी, गुलशन ग्रोवरचा रोड शो आकर्षण





**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.३१मेळघाट** – माजी खासदार नवनीत राणा यांनी धारणी येथील युवा स्वाभिमान पार्टीच्या दहीहंडीमध्ये अचलपूर जिल्हा निर्मितीचा संकल्प केला तसेच अमरावती परतवाडा – धारणी – खंडवा या रस्त्याला राष्ट्रीय महामर्गाचा दर्जा मिळवून देणार असल्याची ग्वाही उपस्थितांना दिली. या दहीहंडीपूर्वी चित्रपटसृष्टीतील खलनायक गुलशन ग्रोअर यांच्या समवेत राणा दाम्पत्याने धारणी शहरात रोड शो करीत नागरिकांचे मनोरंजन केले. जिल्हा परिषद शाळेच्या मैदानामध्ये

ही दहीहंडी आयोजीत करण्यात आली होती. रोड शोच्या वेळी रस्त्याच्या रस्त्याच्या दुतर्फा हजारो युवक, महिला व पुरुषांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. नवनित राणा व आ.रवि राणा यांनी उपस्थितांच्या साक्षीने भ्रष्टाचाराची दहीहांडी फोडून मेळघाटात होत असलेल्या आमदाराच्या भ्रष्टाचाराची विशेष चौकशी करणार असल्याचे व यापुढे कोणत्याही गोरगरिब आदिवासींचा पैसा आमदाराला खाऊदेणार नाही, असा इशारा दिला.दहीहांडीमध्ये मेळघाटातील प्रसिद्ध आदिवासी नृत्याची स्पर्धा घेण्यात आली.मेळघाटातील सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार राणा दाम्पत्यासह माजी आमदार केवलराम काळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नवनित राणा यांनी अमरावतीमध्ये होत असलेल्या शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या माध्यमातून संपूर्ण मेळघाटातील आदिवासी जनतेचा उपचार होणार असल्याचे सांगितले. मेळघाटामध्ये रोजगार हमीच्या माध्यमातून काम करणाऱ्या आदिवासी कामगारांचा पगार २७५ रुपयांवरुन ६०० रुपये करणार असून प्रत्येक आदिवासी कुंटूबाला घरकूल उपलब्ध करुन देणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी दुर्योधन जावरकर, शरद मालवीय, मनिष मालवीय, निरज मालवीय, मुकेश मालवीय, देवेंद टिब अर्जुन पवार, शिवाजी केंद्रे, राजेश वर्मा, उपेन बछले, राम हेकडे, वैभव गोस्वामी, दिनेश शनवारे, सोनु मालवीय, सुनिल बिलवे, मधुसुदन जाने, वर्षा जयस्वाल, शुभम जावरे, शोएब मेमन, तौसीब, जगदीश मालवीय, मोनु मालवीय, प्रमोद मानेकर, रवी विश्वकर्मा, दयाराम पाल, शाहरुख खान, टिप्पु भैया, विकास मोरे, पवन पाटणकर, राजा भाई, महेश गुप्ता, बिलाल टेलको व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# रुरल इन्स्टिट्यूटच्या मैदानात यंदाही भरणार बैलपोळा

## उत्कृष्ट बैलजोडीस मिळणार पुरस्कार, २ सप्टेंबरला पोळा उत्सवाचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती–** श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारे तसेच जनता कृषी तंत्र विद्यालयाच्या संयोजनात रुरल इन्स्टिट्यूटच्या मैदानात यंदाही २ सप्टेंबरला सायंकाळी ५ वाजता मोठ्या बैल पोळ्याचे आयोजन करण्यात आले असून, यानिमित्त परिसरात उत्सवही आयोजित केला आहे. या वेळी उत्कृष्ट बैलजोडींना पुरस्कारही प्रदान केले जाणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले राहतील. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, ॲड. जयवंत उपाख्य भैयासाहेब पुसदेकर, सदस्य सुरेश खोटरे, प्रा. सुभाष बनसोड, प्राचार्य डॉ. विजय ठाकरे, सचिव नरेशचंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शहरात आयोजित होणाऱ्या मोठ्या बैलपोळ्यापैकी हा एक आहे. त्यामुळे या बैलपोळ्यातील देखण्या बैलजोड्या बघण्यासाठी शेतकरी व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. त्यामुळे या परिसरात जत्रेचेही आयोजन केले जाते. येथे मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थ, खेळणी व इतर साहित्याची विक्री होत असते. या ठिकाणी किमान ५० ते ६० बैलजोड्या येत असतात. प्रत्येक बैलजोडी ही साज चढवून वाजत गाजत येते. त्यामुळे नेमकी कोणती बैलजोडी सर्वोत्तम दिसते, याकडेच उपस्थितांचे लक्ष लागलेले असते.मागील काही वर्षांत बैलजोड्यांची संख्या कमी होत असली तरी या ठिकाणी उत्तम बैलजोड्या बघायला मिळतात, अशी माहिती प्राचार्य व संयोजक राजेश खाडे यांनी दिली.

शेंदुरजनाघाट ।विदर्भात प्रसिद्ध असलेल्या राजुरा बाजार येथील बैलबाजार सर्जाराजाच्या साजशृंगाराच्या साहित्याने फुलून गेला असून, शेतकऱ्यांनी साहित्य खरेदीसाठी गर्दी केली होती. वरुड तालुक्यातील राजुरा बाजार येथे इंग्रजकालीन बैलबाजार दर गुरुवारी भरतो. विदर्भात प्रसिद्ध असलेल्या या बैलबाजारात लगतच्या जिल्ह्यासह मध्य प्रदेशातूनही व्यापारी तसेच विक्रेते व शेतकरी येतात. चवरी, मठाठे, बाशिंग, झील, झुल, दोर, बेगड, गरु, वाक, पैंजण आदी साहित्याची दुकाने सजलेली होती. या वर्षी मागील वर्षीच्या तुलनेत २० टक्के दरवाढ झाल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. दरवाढ होऊनही सुखदु:खात नेहमी सोबत करणाऱ्या सर्जाराजाच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची बाजारात झुंबड उडाली होती.

पुरस्काराचे स्वरुप असे रोख रक्कम, चषक, अहेर, बैलांचा साज असे पुरस्काराचे स्वरूप असते. सहभागी होणाऱ्या प्रत्येक बैलजोडीच्या मालकाला दुपट्टा, टोपी व श्रीफळ दिले जाते. याप्रसंगी मान्यवर व परिक्षकांद्वारे बैलजोड्यांचे परीक्षण करून नंतर त्यांना क्रमांक दिले जातात.

# दै. हिंदुस्थानच्या अमृत महोत्सवाचे थाटात उद्घाटन

## पत्रकारांचा लिहण्याचा अधिकार संपुष्टात येता कामा नये

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ अमरावती**

राजकारण बदलत चाललं आहे, लोकशाही ४ पिल्लरवर उभी आहे, पण त्या चार स्तंभाचा समतोल राहिला नाही तर लोकशाही धोक्यात येते. ज्यावेळी देशावर संकट आले तेव्हा पत्रकारांनी देशाला मार्गदर्शन केले आहे. एखाद्याच्या विरोधात जर वृत्तपत्रात बातमी छापली तर लगेच संपादकांना फोन जातो. जे काही चुकीचं आहे ते मीडियाच छापण्याच काम आहे, ते आपण स्वीकारण्याच काम आहे. चुकीचं लिहण्याचा देखील अधिकार पत्रकारांना आहे, लिहण्याचा अधिकार संपुष्टात येता कामा नये, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

दै. हिदुस्थान पत्रकारीता क्षेत्रामध्ये ७५ वर्ष पुर्ण करीत असून शुक्रवार ३० ऑगस्ट २०२४ रोजी अमृत महोत्सवाचा शुभारंभ हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातील स्व. सोमश्वर पुसतकर सभागृह येथे आयोजीत सोहळ्याद्वारे करण्यात आला. दै. हिदुस्थानच्या अमृत महोत्सव सोहळ्याला उद्घाटक म्हणून केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. अमरावतीच्या पावन भूमीतील दै. हिदुस्थान वृत्तपत्राच्या ७५ वर्ष सकारात्मक वाटचाल तसेच आदर्श पत्रकारीतेच्या अमृत महोत्सव जनसामान्यांकरीता गौरवान्वीत करणारा आहे. वीर वामनराव जोशी व पद्मश्री दाजीसाहेब पटवर्धन यांनी दिलेला विचार आणि दृष्टी पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे, स्व. अरूण मराठे यांनी आयुष्यभर जोपासली. आता मराठे परिवाराची तिसरी पीढी हा विचारांचा वारसा भक्कमपणे जोपासत आहे याचे कौतुक आहे. प्रामुख्याने लहान वृत्तपत्रांची लोककल्याणाची भूमिका पाहता वृत्तपत्र क्षेत्राचा विकास साधण्यावर डि शासनाचा पुढाकार सकारात्मक राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी नि व्यक्त केला. यावेळी लोकमत वृत्तपत्र समुहाचे अध्यक्ष विजयबाबू दर्डा, व इंडियन न्यूजपेपर सोसायटी, नवी दिल्लीचे अध्यक्ष राकेशजी शर्मा, लोकमान्यमल्टिस्टेटको ऑप. सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथादै. तरुण भारत बेळगावचे संपादक किरण ठाकुर, एचव्हीपीएमचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, संपादक उल्हास मराठे, मार्गदर्शक डॉ. अनंत मराठे, डॉ. सुरेशराव सावदेकर, प्रतिदिन अखबार–वृत्त केसरीचे संस्थापक संपादक नानक आहुजा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दैनिक हिदुस्थान च्या अमृत महोत्सवी वर्ष निमित्य काढण्यात आलेल्या अमृत मंथन विशेषांक व ७५ संकल्प पत्र चे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दै. हिदुस्थानचे मार्गदर्शक डॉ. अनंत मराठे यांनी केले. संचालन डॉ. वृंदा विवेक मराठे तर आभार सर्वेश विनोद मराठे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील गणमान्य व्यक्तीमत्वांसह मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

### जो माणूस आदल्या जन्मी.....

जो माणूस आदल्या जन्मी पाप करतो तो पुढील जन्मी साखर कारखाना टाकतो किंवा वर्तमानपत्र काढतो, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अमरावती येथील एका वर्तमानपत्राच्या महोत्सवी कार्यक्रमात बोलले. नितीन गडकरींच्या वक्तव्याने सभेत एकच हशा पिकला.

### पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व कमलताई गवई यांचा सत्कार

श्रीहनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहयेथे आयोजीत सोहळ्यादरम्यान प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व मातोश्री डॉ. कमलताई गवई यांचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, लोकमत वृत्तपत्र समुहाचे अध्यक्ष विजयबाबू दर्डा, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, नवी दिल्लीचे अध्यक्ष राकेशजी शर्मा, लोकमान्य मल्टिस्टेटको ऑप. सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा दै. तरुण भारत बेळगावचे संपादक किरणजी ठाकुर यांनी सत्कार करीत आशीर्वाद घेतले.

### लोकशाहीकरीतावृत्तपत्रांचाविकास आवश्यक : राकेशशर्मा

एक सुजाण लोकनेता म्हणून केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी या संदर्भातपुढाकार घेतयापुढेरस्ते वाहतुक आणिमहामार्गविभागांतर्गत जामा संपादन बाबत जाहीराती इंग्लीश वृत्तपत्रासोबतच केंद्र सरकारच्या शासनमान्य जाहीरात यादीत समाविष्ट असलेल्या जिल्हास्तरीय वृत्तपत्रांना देण्यात येणार असल्याची ग्वाही इंडियन न्यूजपेपर सोसायटी, नवी दिल्लीचे अध्यक्ष राकेशजी शर्मा यांनी दिली.

### वृत्तपत्रांना शासकीय पाठबळ आवश्यक : विजयबाबू दर्डा

मुळात सर्वसामान्यांना दिशा देणारे लहान, मोठे वृत्तपत्रांची विश्वासहार्यता आजही शाबुत आहे. त्यामुळे सर्व वृत्तपत्रांच्य विकासाकरीता राज्य व केंद्र शासनाचा जाहीरातींच्या माध्यमातून पुढाक आवश्यक असल्याचे मत लोकमत लोकमत वृत्तपत्र समुहाचे अध्य विजयबाबू दर्डा यांनी व्यक्त केले.

### दै. हिंदुस्थानने पत्रकारिता जपली : किरण ठाकूर

लोकशाहीचा चवथा स्तंभ म्हणून वृत्तपत्रांची महती असतांना बदलत्या परिस्थितीचा प्रामुख्याने भांडवलशाहीचा प्रभाव वृत्तपत्रांवर दिसत आहे. याकरीता शासकीय उदासिन धोरणसुद्धा कारणीभूत आहे. मात्र, अशाही परीस्थितीमध्ये अनेक वृत्तपत्र पत्रकारीतेचे ध्येय जोपासत आहेत. दै. हिंदुस्थानने राष्ट्र शक्ती जपली आणि भक्ती जागवली आहे. हेच पत्रकारीतेचे अंतीम ध्येय असून समाजाला, जनसामान्यांना दिशा देण्यासाठी प्रत्येक वृत्तपत्रांनी पत्रकारीता जपावी असे आवाहन लोकमान्य मल्टिस्टेट को ऑप. सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा दै. तरुण भारत बेळगावचे संपादक किरण ठाकूर यांनी करीत दै. हिंदुस्थानच्या वाटचालीला शुभेच्छा दिल्यात.

# वैयक्तिक व्यवस्थापन व सेवा देखभाल संदर्भात वित्त विभागाची भूमिका महत्वपूर्ण -जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ३० अमरावती–**

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक व्यवस्थापन तसेच वेतन, भत्ते व प्रदानेंची अदायगी आदी सेवा विषयक महत्वाचे कामकाज लेखा व कोषागारे विभागाव्दारे पार पाडल्या जात असल्यामुळे वित्त विभागाची भूमिका ही अतिशय महत्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे केले.

प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी–२), नागपूर व वरिष्ठ कोषागार अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे आयोजित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची कार्यशाळा व पेंशन अदालतीचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, लेखा व कोषागारे सहसंचालक प्रिया तेलगोटे, वरिष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार, कोषागार अधिकारी अमोल ईखे, प्रदीप भुयार, महालेखाकार विभागाचे वरिष्ठ लेखाधिकारी आर.वाय. शेलुकर, सहाय्यक लेखाधिकारी विनय गजभिये, लेखापाल रंजनकुमार सिंग आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. कटियार म्हणाले की, वित्त विभागाच्या अधिनस्त असलेल्या लेखा व कोषागारे विभागाव्दारे माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी तसेच कार्यालयाचे आर्थिक व्यवहाराबाबतचे कामकाज हे अधिक पारदर्शक व गतीने होत आहे. वेतन, भत्ते व इतर प्रदाने या सेवा विषयक बाबींचे ऑनलाईन बिलींग पध्दती अवलंबविल्यामुळे प्रत्येक गोष्टीची नोंद होण्यासह



गतीने कामे होत आहे. कर्मचाऱ्यांनीही नवीन तंत्रज्ञान अवलंबविताना त्याबाबत नकारार्थी न राहता त्याचा स्वखुशीने स्विकार करुन उपयोग आणावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

व्हीपीडीए (आभासी स्वियप्रपंजी लेखा कार्यपध्दती) या ई प्रणालीमुळे एकंदरीत वसूलीच्या रकमा ऑनलाईन पध्दतीने महसूल जमा होत असून त्यात पारदर्शकता आली आहे. डीबीटी व बीडीएस प्रणालीमुळे वित्तीय अनियमिततेवर नियंत्रण ठेवता येणे शक्य झाले आहे. यामुळे आर्थिक व्यवहारात मानवी हस्तक्षेप टाळता आला आहे. ई– पीपीओ, ई सीपीओ, ई जीपीओ या ई प्रणालीमुळे निवृत्तीधारकांचे निवृत्तीवेतन, उपदान तसेच इतर प्रदाने यासंबंधीचे कामकाज गतीने पूर्ण होत आहे, असे महापालिका आयुक्त श्री. कलंत्रे यांनी यावेळी सांगितले.

श्रीमती तेलगोटे म्हणाल्या की, शासकीय कार्यालयातील अनुदान प्राप्ती, वितरण, बीडीएस काढणे आदी वित्तीय बाबी पूर्ण करताना आहरण व संवितरण अधिकाऱ्याची भूमिका महत्वाची आहे. वित्तीय खर्चावर नियंत्रण व देखभाल ठेवणे ही कामे त्यांच्यामार्फत होत असते. शासकीय कार्यालयाच्या खर्चावर वित्तीय नियंत्रण ठेवण्यासाठी विविध ई प्रणाली विकसित करण्यात आल्या आहेत. वित्तीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन डीडीओंना मिळावे यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.व्हीपीडीए (व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंट) सारख्या ई–प्रणालीच्या माध्यमातून विभाग स्तरावरील अखर्चित निधी शासनाला परत करणे सोयीचे झाले आहे. यामुळे अशा खात्यांचे लेखांकन, कॅशबुक नोंदी तसेच प्रदाने करणे सोयीचे झाले आहे. बीडीएस, सेवार्थ, ई कुबेर व ई बील प्रणालीमुळे कार्यालयीन बिलांचे ऑनलाईन जनरेशन तसेच नोंदी अचूक होऊन बील पास लवकर होत आहे, असे श्रीमती पवार यांनी यावेळी सांगितले.सन –२००५ पूर्वी शासकीय नोकरीत लागलेल्या कर्मचाऱ्या संदर्भात त्यांचे डिसीपीएस /एनपीएस मधून जीपीएफमध्ये रुपांतर त्यानुषंगाने पेंशन लाभाविषयी कोषागार अधिकारी श्री. ईखे, श्री. भुयार, श्री अजय काकडे यांनी सविस्तर मार्गदर्शन उपस्थितांना केले.

# आक्रोश मोर्चाने दणाणले दर्यापूर: न्याय न मिळाल्यास विधान सभेवर धडक देण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१दर्यापूर-**
तालुक्यातील मोदी आवास योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेश वाटप करण्यात यावे, या मागणीसाठी ॲड. संतोष कोल्हे यांच्या नेतृत्वात शुक्रवारी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. मोदी आवास योजनेंतर्गत रखडलेला निधीचे लाभार्थ्यांना ताबडतोब धनादेशाचे वाटप करावे. तसेच धनगर व तत्सम जाती-जमातीच्या नागरिकांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा, ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना शहरी भागाप्रमाणेच घरकुलाचा निधी वाढवून देण्यात यावा, आदी मागण्यांसाठी स्थानिक गांधी चौक येथून आक्रोश मोर्चाला सुरुवात



करण्यात आली. शेकडो घरकुल पिडीत स्त्री-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मुख्य मार्गाने मोर्चा उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या कार्यालयावर धडकला. या वेळी ड. कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित घरकुलाच्या लाभार्थ्यांनी निवेदन दिले. मोर्चा विसर्जना वेळी बोलताना ॲड. कोल्हे यांनी शासनाच्या तुघलकी कामकाजावर ताशेरे ओढले. ते म्हणाले, केंद्र व राज्य सरकारच्या योजनेतून देण्यात येणाऱ्या पंतप्रधान घरकुल आवास योजना व मोदी आवास योजनेचा कोट्यवधींचा निधी गेल्या अनेक महिन्यापासून दर्यापूर उपविभागात थकल्यामुळे संबंधित लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शेतकरी सुद्धा मागील खरीप हंगामापासून अनुदानापासून वंचित असून शेतकरी वर्ग शासनाच्या दुर्लक्षामुळे हवालदिल झाला आहे. शासनाने समस्या तातडीने न सोडवल्यास या पुढील मोर्चा हा विधानसभेवर धडकणार अशी घोषणा त्यांनी या प्रसंगी केली. या वेळी शरद पाटील रोहणकर, प्रभाकर चौरपगार, अशोकराव दुधंडे, सुधिर तायडे, गजानन पाटील साखरे, राजेश कोल्हे, सुधीर बसवंत, सुरेंद्र तायडे, विनोद सोनवणे, सतीश चोरपगार, प्रीतम नितोने, अशोक तराळ, ॲड. विजय कोल्हे, मिलिंद गवई, डॉ. अभय पाटील गावंडे, पंकज अनासने, संतोष कुटेमाटे, महादेव सोळंके, अरुण गवळी, दशरथ जामणीक, विजय दुदंडे, राजू गवई, निकेश बोंडे, रामदास तराळ, मामासाहेब टाले, गजानन वाळसे, मनोज अढाऊकर , कुलदीप दुधंडे, प्रीतम नितोने, नागेश रायबोले,,मिलिंद तायडे ,,सुरेंद्र तायडे, सोनोने गुरुजी, महेंद्र कात्रे आदी उपस्थित होते.

# माहुली जहागीरच्या सरपंचपदी प्रीती बुंदीले कायम



## विभागीय आयुक्तांच्या निर्णयाला ग्रामविकास विभागाची स्थगिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ नांदगाव पेठ-**
कंत्राटदाराकडून लाच घेतल्याचा आरोप असलेल्या माहुली जहागीर येथील महिला सरपंच प्रीती मनोज बुंदीले यांच्याविरोधात दाखल तक्रारीनुसार विभागीय आयुक्तांनी ७ ऑगस्ट रोजी त्यांना सरपंच आणि सदस्य पदावरून अपात्र करण्यात आल्याचा निर्णय दिला होता मात्र सरपंच प्रीती बुंदीले यांनी थेट ग्रामविकास मंत्रालयाकडे दाद मागितल्यानंतर २८ ऑगस्ट रोजी ग्रामविकास मंत्री यांनी आभासी पद्धतीने झालेल्या बैठकीत अमरावती विभागीय आयुक्त यांनी प्रीती बुंदीले यांच्याविरोधात दिलेल्या निर्णयाला स्थगिती दिली व माहुली जहागीरच्या सरपंचपदी प्रीती बुंदीले कायम राहतील असा निर्णय दिला आहे. ६ सप्टेंबर २०२३ रोजी कंत्राटदार रामबाबू गणेशराव मोंढे यांच्याकडून सरपंचपती मनोज बुंदीले यांनी चार हजार रुपयांची लाच स्वीकारली होती. लाचलूचपत विभागाच्या वतीने सरपंच प्रीती बुंदीले व मनोज बुंदीले यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यानंतर अग्रीम जामीन मिळवून त्या पदावर रुजू झाल्या होत्या. माहुली जहागीर येथील भाजप कार्यकर्ते व माजी सरपंच सुधीर बीजवे यांनी याबाबत न्यायालयात तसेच विभागीय आयुक्त यांचेकडे लेखी तक्रार केली होती की, लाच घेतल्याचा आरोप असणारी व्यक्ती पदावर राहू शकत नाही त्यामुळे त्यांना अपात्र घोषित करावे. याबाबत विभागीय आयुक्तांनी ७ ऑगस्ट रोजी सुनावणी दरम्यान व प्रत्यक्ष पुराव्याच्या आधारे त्यांना सरपंच आणि सदस्य पदावरून अपात्र असल्याचा निर्णय दिला होता. मात्र या निर्णयाविरोधात सरपंच प्रीती बुंदीले यांनी ग्रामविकास मंत्रालयात धाव घेतली.ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी २८ ऑगस्ट रोजी आभासी पद्धतीने बैठक घेतली.या बैठकीत गिरीश महाजन यांनी अपिलार्थी यांनी गुन्हा केला नसून त्यांच्या पतीने गुन्हा केल्याचे दिसुन येते त्यामुळे प्रीती बुंदीले यांची बाजू समजून घेणे आवश्यक असून त्यांच्यावर असलेला अपात्रतेच्या निर्णयाला तूर्तास स्थगिती देण्यात आली.

### न्यायालयात दाद मागणार

याप्रकरणी आम्ही आधीच उच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले होते. आमच्या कॅव्हेटचा विचार करण्यात आलेला नाही.ग्रामविकास मंत्रालयाने दिलेला हा निर्णय आम्हाला कदापि मान्य नाही, आम्ही पुन्हा न्यायालयात दाद मागू.आमचे काही नेते मोदींजींचे तत्व विसरले असून ते स्वतःच्या स्वार्थासाठी लाचखोर व भ्रष्टाचारी लोकांना साथ देत आहे याचे वाईट वाटते.

**सुधीर बीजवे** तक्रारदार तथा माजी सरपंच

# अमरावती विधानसभा मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी प्रसिध्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती, -**
आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने दि. १ जुलै २०२४ या अहर्ता दिनांकावर आधारित प्रारुप मतदार यादी आज दि. ३० ऑगस्ट रोजी ०३८- अमरावती विधानसभा मतदारसंघातील सर्व ३२२ मतदान केंद्र तसेच अमरावती महानगरपालिका, तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. मतदान केंद्रावरील मतदार यादीत आपल्या नावाची नोंद असल्याची खात्री करावी, असे आवाहन अमरावती विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी यांनी केले आहे.

अंतिम मतदार यादी शासकीय कामाकाजाचे वेळेत मतदार नोंदणी अधिकारी, ०३८ -अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय



अधिकारी अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेली आहे. सर्व मतदारांनी आपले मतदान केंदावर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बिएलओ यांचेकडे किंवा तहसिल कार्यालय, अमरावती येथील निवडणूक विभागात जाऊन मतदान यादीमध्ये आपल्या नावाची नोंद असल्याची खात्री करावी. मतदारांचे नाव मतदार यादीमध्ये नसेल तर नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना-६तसेच नाव किंवा इतर तपशिलात दुरूस्ती करावयाची असल्यास नुमुना-८ भरून व नाव वगळायचे असल्यास नमुना-७ भरून मतदार नोंदणी अधिकारी, ०३८- अमरावती विधानसभा मतदासंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयास सादर करावे.

मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी https://votres.eci.gov.in किंवा व्होटर हेल्पलाईन अप्लीकेशनवर भेट देऊन मतदार घरबसल्यासुध्दा आपले नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट करू शकतात. तसेच मतदार यादीमध्ये नाव शोधण्याकरीता https://electoralsearch.ecigov.in येथे भेट द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# नागपूर विद्यापीठाला ४४ लाखांचा गंडा

## महिला रोखपालाविरोधात गुन्हा दाखल

### सॉफ्टवेअरमध्ये ४३९ पावत्यांमध्ये केला बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर :**
एरवी काही ना काही कारणाने सातत्याने चर्चेत राहणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भ्रष्टाचाराचे मोठे प्रकरण उघडकीस आले आहे. एका महिला रोखपालाने विद्यापीठाला ४४ लाखांहून अधिक रकमेचा गंडा घातला. विद्यापीठाच्या सॉफ्टवेअरमध्ये तिने ४३९ पावत्या अवैध पद्धतीने अपडेट करत अपहार केला. या प्रकरणात अंबाझरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बबिता नितीन मसराम (४०, एसआरपीएफ क्वॉर्टर्स, हिंगणा) असे आरोपी महिलेचे नाव आहे. ती विद्यापीठात कनिष्ठ लिपिक



पदावर असून, कॅश काऊंटरवर रोखपाल म्हणून कार्य करते. विद्यापीठात कॅश काऊंटरवरील रोखपाल एका सॉफ्टवेअरच्या माध्यमातून काम करतात. त्यांना युझर आयडी व पासवर्डदेखील देण्यात आला आहे. जर एखादी नोंद चुकली, तर त्याच दिवशी त्यात बदल करण्याचे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत. जर चूक नंतर समोर आली, तर अधिकारी पावती मॉडिफाय करू शकतात. २०२३ मधील एका पावतीमुळे हा भ्रष्टाचार समोर आला. एम. के. बिल्डरने विद्यापीठाच्या अभियंता विभागाच्या मार्फत ३४,१६० रुपयांची पावती सुरक्षा ठेवीच्या रिफंडसाठी जमा केली. वित्त विभागातील कर्मचाऱ्यांनी तपासणी केली असता, मूळ पावती केवळ ४,१६० रुपयांची होती. त्यात बबिता मसरामच्या लॉगिन आयडीवरून २०२२ मध्येच मॉडिफिकेशन झाले होते. याबाबत विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल यांनी मसरामला विचारणा केली असता तिने चुकीने मॉडिफिकेशन झाल्याचा दावा केला व ३० हजार रुपये विद्यापीठाच्या खात्यात भरले. मात्र, पालीवाल यांना संशय आला व त्यांनी तिच्या युझर आयडीवरून दिलेल्या पावत्यांची तपासणी केली. त्यात ४३९ तिने मॉडिफाय करत विद्यापीठाला तब्बल ४४ लाख ४० हजारांचा गंडा घातल्याची बाब समोर आली. विद्यापीठाने याची आणखी सखोल चौकशी केली. पालीवाल यांच्या तक्रारीवरून मसरामविरोधात अंबाझरी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बोरगाव निस्ताने - सोनोरा - झाडा मार्गावरील थरारक घटना

# बाईकस्वार युवकांवर बिबट्याचा हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ धा. रेल्वे-**
बोरगाव निस्ताने, सोनोरा काकडे यासह काही शेत शिवारात बिबट दिसल्यामुळे परिसरातील दहशत निर्माण झाली आहे. सोनोरा येथील दुचाकीवर युवकांवर बिबट्याने केला स्वार केल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागातर्फे संबंधीत ग्रामपंचायतीला गावकऱ्यांना दवंडीद्वारे सुचना देण्याचे ग्रामपंचायतीला कळविण्यात आले आहे.

बोरगाव निस्ताने, सोनोरा यासह काही गावातील शेत शिवारात बिबट्या सदृश्य प्राणी दिसले. तसेच पाच ते सहा दिवस ंपूर्वी बिबट्याने या परिसरात हरणाची शिकार केली होती. गुरुवारला सोनोरा येथील किशोर पाते हे झाडा येथून बोरगाव निस्ताने येथे दुचाकीने जात असतांना खैरग पुलाजवळ अचानकपणे दोन बिबट्यांनी त्यांच्यावर हल्ला चढविला व दुचाकीवरून खाली पाडले. आरडाओरड केल्याने हे दोन्ही बिबट्यांनी धूम ठोकली.

किशोर पाते यांनी सरळ बोरगाव निस्ताने गावात धाव घेतली व घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. शेतशिवारात बिबट्या सदृश्य प्राणी असल्याची माहिती वन विभागाला देण्यात आली आहे. शेतामध्ये खरीप हंगामातील आंतर मशागतीचे काम सुरू आहे. त्यामुळे नागरिकांत भीती निर्माण झाल्याने कामे रखडली आहे. या घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली होती. चांदुर रेल्वेचे वन परिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल किशोर धोत्रे, वनरक्षक शिव राठोड, शरद खेकाळे, राजु चव्हाण, अंकुश खेकाळे यांनी भेट दिली आहे. वन विभागातर्फे शोध कार्य सुरू आहे.

### सुरक्षेच्या सूचना दिल्या

गावकऱ्यांना त्यांचे सुरक्षेच्या सुचना दिल्या आहेत. रात्रीच्या वेळेसशेतामधील कोणत्याही कामासाठी लोकांना एकटे जाऊ देऊ नये. रात्रीच्यावेळी एकटे बाहेर न पडणे तसेच शक्यतोवर बाहेर जाताना तिथे चौघे मिळून हातात काठी घेऊनच बाहेर जावे. लहान मुलांना एकटे सोडू नये. रात्रीला घराबाहेर झोपू नये. वन्यप्राण्यांचे जिवितास धोका निर्माण होईल, असा अनुचित प्रकार घडू देऊ नये.

- किशोर धोत्रे, (वनपाल चांदुर रेल्वे परिक्षेत्र

# मुदतवाढीनंतरही आरटीई प्रवेशाला नो रिस्पॉन्स

## प्रवेश उशिरा सुरू झाल्याचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती-** यंदा आरटीईमध्ये आजवर २ हजार ३०० विद्याथ्यर्थ्यांपैकी १ हजार ५१३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. त्यामुळे उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील ७८७ बालकांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली. यासाठी १६ ते २६ ऑगस्टपर्यंत वेळ देण्यात आली होती. मात्र, या फेरीला पालकांनी रिस्पॉन्स न दिल्याने १० दिवसांत एकही प्रवेश निश्चित होऊ शकला नाही. परिणामी शासनाने पुन्हा २९ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिली. परंतु आता पुन्हा मुदतवाढ देण्यात येणार नसल्याची सूचना शिक्षण विभागाने जाहीर केली आहे. त्यामुळे रिक्त राहिलेल्या जागांबाबत शिक्षण विभाग काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे.यंदा जिल्ह्यात आरटीई प्रवेशासाठी २३२ शाळांमध्ये २ हजार ३६९ जागा प्रवेशासाठी उपलब्ध होत्या. त्यासाठी जिल्ह्यातून ६ हजार ६२६




विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत. त्यापैकी २ हजार ३०० विद्यार्थ्यांची लकी ड्रॉच्या माध्यमातून झाली निवड आहे. प्रवेशासाठी २ हजार ३०० बालकांची निवड करण्यात आली होती. पहिल्या फेरीत १५१३ बालकांचे प्रवेश निश्चित झाल्याने उर्वरित ७८७ बालकांचे प्रवेश प्रतीक्षा यादीतून करण्यासाठी १६ ते २६ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु शाळा सुरू होऊन दीड महिना लोटल्याने अर्ज दाखल करणाऱ्या बऱ्याच बालकांचे प्रवेश आधीच निश्चित झाले आहेत. त्यामुळे या १० दिवसांत एकाही बालकाचा प्रवेश निश्चित झाला नाही. त्यामुळे शासनाकडून या प्रक्रियेला दोन दिवसांची मुदतवाढ दिली होती. पालकांना बालकांचा २९ ऑगस्टपर्यंत प्रवेश निश्चित करायचा होता. त्यानंतर मुदतवाढ मिळणार नसल्याचे शिक्षण विभागाने जाहीर केले होते. सद्यःस्थितीत आरटीई पोर्टल बंद दाखवण्यात येत आहे.त्यामुळे किती जागा रिक्त आहेत, हे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले नाही. त्यामुळे रिक्त जागांवर शिक्षण विभाग काय निर्णय घेतील, आता याकडे लक्ष लागले आहे.-

# शहरात दोन तासात २० मिमी पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३१ अमरावती-**
शहरात शुक्रवारी (दि. ३०) दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास जोरदार पावसाला सुरुवात झाली अन् अवघ्या



दोन तासात २० मिमी. पावसाची नोंद झाली असल्याचे हवामान अभ्यासक प्रा. अनिल बंड यांनी सांगितले आहे.

मागील चार ते पाच दिवसांपासून पावसाने उघाड दिली होती. आज सकाळपासून कडक ऊन होते मात्र दुपारी तीन वाजतापासून अचानकवातावरणात बदल झाला आणि साडेतीन वाजता जोरदार पावसाला सुरूवात झाली. तर सायंकाळी ६ वाजता पावसाने उसंत घेतली. या पावसामुळे शहरातील रस्त्यांवर काही ठिकाणी पाणी साचले होते. दरम्यान बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे शनिवारपासून (दि. ३१) शहरासह जिल्ह्यात पावसाचा जोर वाढणार आहे. ३ सप्टेंबरपर्यंत हा पाऊस सार्वत्रिक राहण्याची शक्यता आहे.

# 'त्या' जागेवर संत काशिनाथ बाबा यांच्या नावाने सांस्कृतिक सभागृहाची निर्मितीग्रामसभेत ठराव मंजूर,भक्तांच्या मागणीपुढे प्रशासन नमले

## पोलिसांच्या प्रचंड बंदोबस्तात पार पडली ग्रामसभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३१नांदगाव पेठ-**
ग्रामदैवत संत श्री काशिनाथ बाबा यांच्या भक्तांचा मेळा दिवसेंदिवस वाढत असून गावातील जागा अपुरी पडत असल्याने नाफडे पेट्रोलपंप नजीक असलेल्या शासकीय जागेवर संत काशिनाथ धाम बनावे अशी भक्तांची इच्छा असतांना त्याठिकाणी दुसऱ्या गटाने विरोध दर्शवत उच्च न्यायालयात याचिका सादर केली होती. मात्र भक्त आपल्या मागणीवर ठाम असल्याने गुरुवारी शेकडो नागरिक व भक्तांच्या उपस्थितीत पार पडलेल्या ग्रामसभेने अखेर ती जागा ग्रामपंचायतच्या ताब्यात घेऊन त्याठिकाणी सांस्कृतिक सभागृहाची निर्मिती करून त्या सभागृहाला संत काशिनाथ महाराज यांचे नाव देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.ग्रामसभेत भक्त आक्रमक झाले होते अखेर त्यांच्या मागणीपुढे ग्रामपंचायत प्रशासन नमले. गुरुवारी झालेली ग्रामसभा ही विविध मुद्द्यांवर चांगलीच गाजली. उपसरपंच मजहर खा, सफदर खा यांच्या राजीनाम्याची मागणी सुद्धा ग्रामसभेत करण्यात आली.तर गावातून आलेल्या दातपाडी नदीवर असलेले सर्व अतिक्रमण काढून टाकावे, नदीला मोकळा श्वास घेऊ द्यावा, गावातील मुख्य रस्त्यावर असलेले अतिक्रमण त्वरित काढावे, पंधरा वर्षांपासून एकाच कंत्राटदाराकडे काम असल्याने त्याला काळ्या यादीत टाकावे,जुन्या कामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे,छत्रपती शिवाजी महाराज



यांच्या अश्वारूढ पुतळ्याबाबत मतदान घ्यावे अश्या अनेक महत्वपूर्ण मुद्द्यांवर ग्रामसभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले. संत काशिनाथ बाबा यांच्या जागेसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून वाद सुरू असून अखेर काही अंशी हा वाद मिटल्याने भाविकभक्तांमध्ये आनंदाची लाट आहे. ग्रामसभेत कोणत्याही प्रकारचा गोंधळ होऊ नये म्हणून पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांनी प्रचंड बंदोबस्त लावला होता तसेच पोलिसांची तुकडी देखील सज्ज ठेवली होती.

सरपंच कविता डांगे, उपसरपंच मजहरखा सफदर खा, ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोंडे, ग्रा.पं. सदस्य शिवराजसिंह राठोड, छत्रपती पटके, बाळासाहेब राऊत, किशोर नागपुरे,बलविर चव्हाण,आशा चंदेल, विभा देशमुख, उर्मिला गायगोले,वृषाली इंगळे,मंदा कापडे, ज्योती कुकडे, वंदना भटकर,सलमा सुलताना हमीद शहा, शकिर परवेज,जगदीश इंगोले यांच्या उपस्थितीत ही ग्रामसभा शांततेत पार पडली. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती.

# राज्य शासनाने बदल्यांसाठी कायदाच बदलला;अफलातून निर्णय

## मंत्रालय हाऊसफुल्ल, न्यायालयाचा मार्ग बंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

राज्य सेवेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यासाठी राज्य शासनाने चक्क बदल्यांचा कायदाच बदलला आहे. त्याकरिता राज्यपालांच्या आदेशाने ‘राजपत्र’ प्रसिद्ध झाले असून आता कर्मचाऱ्यांना न्यायालयीन मार्ग त्यामुळे बंद झालेला आहे. मे ऐवजी ऑगस्टमध्ये होणाऱ्या या बदल्यांमुळे दोन महिन्यांचे शैक्षणिक नुकसान होणार हे मात्र निश्चित आहे.

राज्य शासनाचे ३३ विभाग आणि महामंडळे आस्थापनावरील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दरवर्षी मे महिन्यात प्रशासकीय बदल्या होतात. त्यानंतर विनंती बदल्या केल्या जातात. यंदा लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे राज्य शासनाला मे मध्ये प्रशासकीय बदल्या करता आल्या नाहीत; मात्र जूनमध्ये आचारसंहिता संपल्यानंतर बदल्या करणे शक्य असताना शासकीय बाबूंनी बदल्यांचे धोरण न राबविल्यामुळे यंदा राज्यात शासकीय बदल्या होणार नाहीत, असा समज झाला होता; मात्र निवडणूक आयोगाने शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचा फतवा काढल्यामुळे राज्य शासनाची गोची झाली. कालावधी निघून गेल्यानंतर प्रशासकीय बदल्या कशा करण्यात संभ्रम निर्माण झालेला असतानाच राज्य शासनाने चक्क कायद्यात बदल करून निवडणुकीच्या तोंडावर ‘अर्थ’पूर्ण राजकारण करण्यासाठी बदली अधिनियम २००५ मध्ये सुधारणा केली आहे. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने २९ ऑगस्ट २०२४ रोजी बदल्यांसंदर्भात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या आदेशाने ‘राजपत्र’ प्रसिद्ध केले आहे.

**राज्यपालांच्या आदेशाने राजपत्र जारी**

कुठलाही नवीन कायदा किंवा बदल करायचा असल्यास मंत्रिमंडळाचा निर्णय घेऊन तो निर्णय राज्यपालांकडे कायदा पारीत करण्यासाठी पाठविला जातो.बदली अधिनियम २००५ नुसार राज्य शासन दर वर्षी मे महिन्यात राज्यातील शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या करीत असते; मात्र यावेळी विलंब झाला असल्याने शासनाने मंत्रिमंडळात निर्णय घेत २००५ च्या बदली कायद्यात बदल केला आहे. राज्यपालाने यास मंजुरी प्रदान करीत राजपत्र जारी केले आहे. बदली अधिनियम (सुधारणा) ऑगस्ट २०२४ असे म्हणावे लागणार आहे. ज्या नवीन अधिनियमांमुळे राज्यात दोन दिवसात बदल्यांचे सत्र राबविले जाणार आहे.

**मंत्रालय हाऊसफुल्ल, अधिकाऱ्यांची गर्दी**

राज्य शासनाने मंत्रिमंडळाच्या बैठकीत बदल्या करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता बदल्या होणार असल्याचे संकेत मिळताच राज्य सेवेतील अधिकारी सोयीचे ठिकाण मिळण्यासाठी मंत्रालयात ठाण मांडून आहेत. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर बदल्या होणार असल्याने अनेकांचे खिसे गरम होतानाचे चित्र आहे. महत्त्वाच्या पोस्टिंगकरिता लाखोंची बोली लावण्यात येत असल्याची माहिती आहे. गृह, महसूल, वन, परिवहन, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण हे विभाग सध्या अव्वलस्थानी असल्याचे दिसून येते. बदलीसाठी मंत्रालयात गर्दी वाढलेली असताना अनेक अधिकारी विनारजा घेऊन राजरोसपणे मंत्रालयात फिरत असल्याचे चित्र आहे.

# ३ सप्टेंबर ला भव्य तान्हा पोळा सजावट स्पर्धा; बक्षिसांची होणार लयलूट

## भाजीबाजार येथे स्पर्धेचे भव्य आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

शिवसेनेचे प्रविण हरमकर यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही भव्य तान्हा पोळा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.भारतीय संस्कृती ही फार वैविध्यपूर्ण नटलेली दिसुन येते येथे प्रत्येक गोष्टीला त्या त्या ठिकाणी काही विषेश महत्त्व प्राप्त झाले आहे या आपल्या संस्कृती मधे अगदी निसर्गा पासून तर पाण्या पर्यंत दगडा पासून तर प्राण्यांन पर्यंत प्रत्येकाला महत्व देऊन त्यांचे वेळोवेळी काही सणांच्या नावाने पुजन केले जाते असाच कृषीप्रधान देशातील शेतकर्यांचा जीवलग मित्र बैलांच्या पुजनाचा सण म्हणजे बैल पोळा याच बैल पोळ्याचे अवचीत्य साधुन व अंबागेटच्या आतील जुन्या अमरावतीच्या कित्येक वर्षाच्या परंपरेचे जतन करीत शिवसेनेचे प्रविण हरमकर यांनी यंदाही भव्य तान्हा पोळा सजावट स्पर्धेचे आयोजन दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी जुनी कोतवली भाजीबाजार येथे दुपारी ४ वाजता केले आहे या स्पर्धेच(१)प्रथम रोख बक्षीस १५०१ रू(२)द्वितीय रोख बक्षीस १००१रू(३) तृतीय रोख बक्षीस ७०१रूठेवण्यात आले आहे.सोबतच स्पर्धेत भाग घेतेलेल्या स्पर्धकांच्या वेशभूषेचे परिक्षण करून त्यांनाही (१) प्रथम (२) द्वितीय (३) तृतीय पारितोषिक देण्यात येईल. सोबतच प्रत्येक सहभागी स्पर्धकाला बक्षिस देण्यात येईल.प्रेक्षकांनाही लकी ड्रॉ मधे भाग घेण्याची संधी मिळेल(१) प्रथम ड्रॉ सोन्याची नथ(२) दुसरा ड्रॉ पैठणी साडी(३) तीसरा ड्रॉ डिनर सेटदेण्यात येणार आहे.तसेच मुलांसोबत महिलांच्या ही सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अनेक गेम शो चे आयोजन करण्यात आले असून त्यातही हमखास बक्षीस मिळण्याची संधी या कार्यक्रमात मिळणार आहे तरी सर्वांनी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे व हमखास बक्षीस मिळवावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अजित पवार यांच्या दौऱ्यासाठी आ. देवेंद्र भुयार करीत आहे प्रशासकीय यंत्रणेचा गैरवापर

## पत्रपरिषदेत भाजप नेत्यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

मोर्शी वरुड मतदारसंघात राज्याचे उपमुखमंत्री अजित पवार सह राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) यांचा डझनभर मंत्र्यासह जनसन्मान यात्रा शहरात येते आहे. राजकीय दौरा असून त्या दौऱ्याला शासकीय रूप आणुन शासकीय यंत्रणेचा गैरवापर करीत असल्याचा भाजपा पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी दुपारी १ वाजता श्रीकृपा हॉटेल येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. स्थानिक प्रशासनाला दौऱ्याबाबत विचारणा केली असता त्यांनी राजकीय दौरा असल्याचे सांगितले. पण दौरा जर राजकीय व पक्षीय आहे तर त्यात महिला रूग्णालयाचे भूमीपूजन, श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण व मोर्शी येथील नगर परिषद इमारतीचे लोकार्पण हे कसे काय करु शकते व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बॅनर पोस्टर व पत्रिकेत कुठेही नाव नाही व आ. देवेंद्र भुयार स्थानिक पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यां मार्फत आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व बचतगट समन्वयक याना गावात फिरून प्रत्येक गावातून ५०० महिला आणण्याचे उद्दिष्ट दिले आहे. जर त्यांनी ५०० महिलांना गावातून आणले नाही.तर कारवाहीचे संकेत सोशल मिडीयाच्या माध्यमातून दिले आहे अश्याप्रकारे आमदार प्रशासनाला हाती घेऊन पदाचा दुरुपयोग करीत असल्याचा आरोप पत्रपरिषदेत केला.





गेल्या ४० दिवसापासून मोर्शी मतदारसंघातील काही मंडळात अतिवृष्टी होऊन आंबिया बहराचे संत्रा ७५ टक्के खाली आले त्यासाठी आमदाराने शासनाकडे कोणताही पाठपुरवठा केलेला नाही. विधानसभा निवडणूक एक दोन महिन्यांवर येऊन ठेपली असता आपल्या पक्षाच्या नेत्याला खुश करण्यासाठी गावा गावातून महिलांना सक्तीने आणूनगर्दी जमवण्याच्या प्रशासनाच्या माध्यमातून आ. देवेंद्र भुयार चा प्रयत्न आहे. या मतदारसंघात शेतकरी हवालदीत झाला असून आमदाराला मागील ५ वर्षात कधीही महिलासशक्ती करण्याची आठवण आली नाही आता विधानसभा निवडणूक समोर आली असतांना अचानक मोर्शी मतदारसंघातील महिलाची काळजी आमदाराला वाटू लागली आहे. लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची असून ती मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुखमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुखमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून लागू झाली असून त्याचे श्रेय आ. देवेंद्र भुयार यांनी घेण्याचा प्रयत्न करू नये.

# सावधान! अनिल देशमुख यांचे पुस्तक येत आहे निवडणुकीपूर्वी येणार मोठे राजकीय वादळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

लोकसभेच्या असो, वा विधानसभेच्या. सार्वत्रिक निवडणुका आल्या की राजकीय पक्ष, नेत्यांकडून आरोप-प्रत्यारोप, गौप्यस्फोटांची मालिका सुरू होते. खळबळजनक खुलासे केले जातात, त्यातून राजकारणालाही कलाटणी मिळते. महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर होणा-या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सावधान ! माजी गृहमंत्री व राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते अनिल देशमुख यांचं ‘ डायरी ऑफ होम मिनिस्टर ‘ हे पुस्तक बाजारात येत आहे. यामुळे विधान सभा निवडणुकीपूर्वीच महाराष्ट्रात मोठे राजकीय वादळ निर्माण होण्याची शक्यता आहे.




महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख अकरा महिने तुरुंगात होते. ते षडयंत्र काय होते ? हे जाणून घेण्याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला आहे. खुद्द देशमुख यांनी याबाबत पुस्तक लिहिले असून विधानसभा निवडणुकीपूर्वी हे पुस्तक मेहता पब्लिकेशनकडून प्रसिद्ध होत आहे. यात अनेक खुलासे आणि धक्कादायक माहिती असण्याची शक्यता आहे, त्यामुळे पुस्तक बाजारात आल्यावर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता असते, त्यामुळे सर्वांचे लक्ष या पुस्तकाकडे लागले आहे.अनिल देशमुख गृहमंत्री असताना त्यांच्यावर मुंबईच्या तत्कालीन पोलीस आयुक्त परमवीर सिंह यांनी पुराव्याशिवाय गैरप्रकाराचे आरोप केले होते. या आरोपांमुळे देशमुख यांना राजीनामा द्यावा लागला होता. गाडीने त्यांच्या घरावर छापे घातले होते. नंतर राज्यातील सरकार बदलले. हे प्रकरण देशभर गाजले होते. देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपये वसुलीचा आरोप भाजप नेते करीत होते. प्रत्यक्षात आरोपपत्रात ही रक्कम एक कोटींच्या रक्कमेचा समावेश होता. आरोप कर्ते परमवीर सिंह यांनीही त्यांच्याकडे कुठलेही पुरावे नसल्याचे आणि ऐकीव माहितीवर आरोप केल्याचे सांगितले होते. त्यामुळे हे प्रकरण खरेच होते की अनिल देशमुख यांना अडचणीत आणण्यासाठी किंवा तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे सरकार उलथवण्यासाठी रचलेले षडयंत्र होते काय? असा प्रश्न विचारला जात होता.

# कचऱ्याचे ढीग काढण्यासाठी मागितली ३१ मार्चपर्यंत मुदत

## मनपाने १० फेब्रुवारीपर्यंत माहिती द्यावी - सुप्रीम कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**


सुकळी कंपोस्ट डेपो प्रदूषण प्रकरणी सुप्रीम कोर्टात शुक्रवारी झालेल्या सुनावणीत मनपाद्वारे डेपोवरील कचर्याचे ढीग काढण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत मागण्यात आली आहे. मनपाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात आम्ही बायोमायनिंग प्रक्रियेद्वारे कचर्याचे ढीग नष्ट करू, असे म्हटले आहे. सुकळी कंपोस्ट डेपोवर साठलेल्या कचर्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण * होत असल्याचे सिद्ध झाल्यावर राष्ट्रीय हरित लवादाने मनपाला ४७ कोटी रुपये दंड ठोठावला. या प्रकरणी समाजसेवक गणेश अनासने यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे कडे तक्रार केली होती.सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान वादी मनपा व प्रतिवादी गणेश अनासने यांचा युक्तिवाद ऐकून घेतला. मनपाने सुकळी कंपोस्ट डेपोला हजार घनमीटर कचरा असून, ५० हजार घनमीटर कचरा एसएलएफ खोदकाम प्रक्रियेद्वारे काढला जाईल. बायोमायनिंग प्रक्रियेद्वारे हे काम ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण केले जाईल, असे प्रतिज्ञापत्रात सांगितले. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने सुकळी कंपोस्ट डेपोवरील कचरा किती काढला याबाबत माहिती सादर करण्यासाठी १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदत दिली असून, याच दिवशी पुढील सुनावणी होणार आहे.



# नांदगाव पेठ येथील कावडयात्रेने संतनगरी झाली भक्तिमय : आ. यशोमती ठाकूर यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३१ नांदगाव पेठ**

श्रावण मासाचे औचित्य साधून भोलेनाथ क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने २६ ऑगस्ट रोजी काढण्यात आलेल्या कावड यात्रेने संतनगरी नांदगाव पेठ भक्तीमय झाले होते. संगमेश्वर मंदिर येथून जल घेऊन ही कावड यात्रा प्रारंभ झाली आणि भोलेनाथ चौक येथील मंदिरात जलार्पण करून कावड यात्रेचा समारोप करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात भोलेनाथांच्या प्रतिमेसमोर आ. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी भक्तांमध्ये उत्साह संचारला होता. श्रावणातील सोमवारला विशेष महत्व असून सोमवारी शिवपिंडीला पवित्र जलाव्दारे जल अभिषेक घालण्याची परंपरा आहे. त्यामुळे प्रत्येक श्रावण सोमवारी शिवभक्त कावडधारी वेगवेगळ्या तिर्थस्थळावरून पवित्र जल आणून शिवमंदीरात जलाभिषेक करीत असतात. सोमवारी



नांदगाव पेठ येथे मोठ्या जल्लोषात शिवभक्तांनी कावड यात्रेचे आयोजन करत आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलेल्या कावडने संगमेश्वर नदीतील जलाचा जलाभिषेक शासकीय वसाहत स्थित महादेव मंदिरात केला.संस्थेचे अध्यक्ष पंकज शेंडे व उपाध्यक्ष अमित यादव यांच्या उत्कृष्ट नियोजनातून विविध धार्मिक देखावे सादर करत गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. हरहर महादेव च्या गजरात संगमेश्वर देवस्थान येथून ही कावड यात्रा जल घेऊन संगमेश्वर नगर, यावलपुरा,बारीपुरा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोहचली.हजारो भक्तांच्या उपस्थितीत आ. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर माळीपूरा मार्गाने ही कावडयात्रा बस स्टॅण्ड येथून शासकीय वसाहत स्थित महादेव मंदिरात पोहचली व संगमेश्वर येथून आणलेले जल महादेवाच्या पिंडीवर अर्पण करून कावडयात्रेचा समारोप करण्यात आला. दुसऱ्या दिवशी मंदिर परिसरात महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.यावेळी शेकडो गावकरी नागरिक, भक्त मंडळी या कावडयात्रेत सहभागी झाले होते.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी नांदगाव खंडेश्वर व तिवसा येथे मेळावा; लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३१ अमरावती**

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत मागास बहुजनासाठी शासनाच्या विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी नांदगाव खंडेश्वर व तिवसा तालुकात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून योजनेची सविस्तर माहिती मेळाव्याच्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांची माहिती सर्व विद्यार्थी, लाभार्थी, पालकांपर्यंत तसेच सर्व शाळा प्रमुखांपर्यत पोहोचविण्यासाठी नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील विनायक विज्ञान विद्यालय येथे तर तिवसा तालुक्यात यादव देशमुख कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी योजनेची माहिती तसेच योजनेचा लाभ घेण्याकरीता आवश्यक पात्रता, अर्ज कुठे व कसे करायचा याची सविस्तर माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात आली. तसेच योजनेच्या अनुषंगाने मान्यवरांनी लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# पोटे पाटील यांच्या घरी सदिच्छा भेट.....



माजी राज्यमंत्री, भाजपा शहर अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांच्या निवास्थानी केंद्रीयमंत्री मा.ना. श्री नितीन गडकरी साहेब यांनी शुक्रवारी सदिच्छा भेट दिली या वेळी त्यांनी भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत शहरातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला.

# अजितदादा म्हणतात... आपल्याकडे असणाऱ्या ५४ जागांवर आपण लढणारच

## अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांचा राष्ट्रवादी मध्ये लवकरच प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ मुंबई**

राज्याला विधानसभा निवडणुकांचे वेध लागले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीत जागावाटपावरून रस्सीखेच सुरू झाली आहे. महाविकास आघाडीच्या तुलनेत महायुतीत जास्त चढाओढ दिसून येत आहे. अजून जागावाटपाचा निर्णय झालेला नाही. मात्र त्याआधीच अजितदादांनी दबावाचं राजकारण सुरू केलं आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीची लोकसभा निवडणुकीतीलकामगिरी पाहता त्यांना किती जागा मिळतील याची शाश्वती नाही. मात्र अजित पवारांनी आधीच किती जागा पाहिजे आहेत याचा आकडाच सांगून टाकला आहे.



आपल्याकडे असणाऱ्या ५४ जागांवर आपण लढणारच आहोत पण एकूण ६० जागांवर आपल्याला काम करायचं आहे असे अजित पवार म्हणाले. मुंबईत काल संध्याकाळी अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अजित पवारांनी महायुतीला अनपेक्षित असे वक्तव्य केले. याबरोबरच आणखी काही आमदार आपल्या संपर्कात असून ते लवकरच पक्षात प्रवेश करतील असे अजित पवार म्हणाले.

मुंबईतील वांद्र पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार झिशान सिद्दीकी, नाशिकच्या इगतपुरी मतदारसंघाचे आमदार हिरामण खोसकर, अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके असे आमदार आपल्यासोबत आहेत असे अजित पवार म्हणाले. या आमदारांचा लवकरच पक्षात प्रवेश होईल असं संकेत अजित पवार यांनी या बैठकीत दिला. आता यातील किती जण प्रत्यक्षात प्रवेश करतील याचं उत्तर थोड्याच दिवसांत मिळेल.

दरम्यान, आता अजित पवार यांनी थेट आकडाच जाहीर केल्याने महायुतीत अस्वस्थता निर्माण होणे सहाजिकच आहे. महायुतीत अद्याप जागावाटपाच्या चर्चा सुरू झालेल्या नाहीत. निवडणुकीला अजून दोन महिन्यांचा काळ बाकी आहे. त्यामुळे इतक्यात चर्चा सुरू होतील याची शक्यता कमीच आहे. तरीदेखील घटक पक्षांकडून दबावाचं राजकारण केलं जात आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडूनही १०० ते ११० जागांची मागणी होत आहे. त्यामुळे भाजपाची मोठी कोंडी होताना दिसत आहे. यामध्ये कुणाला किती जागा मिळणार याचं गणित अजून ठरलेलं नाही. आगामी काळात काय घडामोडी घडतात हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# विदर्भाच्या कॅलिफोनिर्यात संत्रावर शंखी रोगाचा प्रादुर्भाव

## संत्रा उत्पादक चिंताग्रस्त; शासनाद्वारे मदतीची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ अमरावती**

संत्र्याच्या उत्पादनावर अर्थकारण असलेल्या विदर्भातील कॅलिफोर्नियाचा शेतकरी झाडांवर झालेल्या शंखी रोगाच्या प्रादुर्भावाने हवालदिल झाला आहे. अतिपावसामुळे आधीच आंबिया बहराची संत्री गळून पडत असताना हे मोठे संकट सर्व नेस्तनाबूत करेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

नगदी पीक समजल्या जाणारे संत्रा पीक हातचे गेल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. खरिपातील पिके अतिपावसामुळे बाधित होत असतानाच यंदा संत्र्याच्या दोन्ही बहरांना ग्रहणच लागले. फळगळ होत असल्याने संत्रा उत्पादकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. बाधित झाडांचा सर्व्हे करण्याची मागणी शेंदूरजनाघाट परिसरातील शेतकरी करीत आहेत. बदलत्या वातावरणात व रोगाने संत्रा झाडे पिवळी पडून वाळू लागल्याने



विदर्भाचा कॅलिफोर्निया नष्ट होण्याच्या मार्गावर दिसून येत आहे. सततच्या पावसामुळे संत्रा पिकावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने आंबिया बहराच्या गळतीचे प्रमाण ३० ते ४० टक्के एवढे असल्याचे संत्रा उत्पादक बोलत आहेत. त्यामुळे नुकसानाची भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यावर्षी सुरुवातीपासून संत्रा फळाला गळती सुरू आहे. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात व ऑगस्ट महिन्यातही दररोज पाऊस असल्याने आंबिया बहराची संत्री मोठ्या प्रमाणात गळत आहेत, तर मृग बहर फुटलाच नाही. यावर्षी आंबिया बहर जानेवारीमध्ये मोठ्या प्रमाणात फुलला होता. मात्र, मार्च, एप्रिल महिन्यातच मोठ्या प्रमाणात गळती लागली. पावसाळा सुरू होताच ही गळती वाढली आहे. संत्रा उत्पादन घेणाऱ्या शेंदूरजनाघाट, तिवसाघाट, बारगाव, जामगाव, धनोडी, लोणी, जरूड, टेंभुरखेडा, मालखेड, धनोडी पंढरी, पुसला, सुरळी, एकदरा, झटामझिरी, वाई, राजुरा बाजार परिसरात मोठ्या प्रमाणात संत्रा झाडांवर शंखी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी चिंतेंत पडला आहे.

# शहरातील व्यावसायिक रामप्रकाश मिश्रा यांच्यावर प्राणघातक हल्ला; चाकूने केले वार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ अकोला**

शहरातील प्रख्यात व्यावसायिक तथा ईगल इन्फ्रा लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी रामप्रकाश मिश्रा यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात हल्लेखोरांनी चाकूने प्राणघातक हल्ला केल्याची घटना शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास मिश्रा यांच्या घराबाहेर घडली. या घटनेत मिश्रा हे गंभीर जखमी झाले असून त्यांना वाहन चालकाने तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्याची माहिती आहे.



व्यावसायिक रामप्रकाश मिश्रा हे शुक्रवारी रात्री दिल्ली येथून अकोल्यात पावणे अकराच्या सुमारास दाखल झाले. चारचाकी वाहनाचा दरवाजा उघडून ते बाहेर येताच त्याठिकाणी दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्यावर अचानक चाकूने हल्ला चढविला. त्या हल्लूयाचा मिश्रा यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. ही बाब मिश्रा यांच्या वाहन चालकाच्या लक्षात येताच त्याने मिश्रा यांच्याकडे धाव घेतली. तोपर्यंत हल्ला करून दोन्ही हल्लेखोर दुचाकीने पसार झाले. वाहन चालकाने मिश्रा यांना रक्तबंबाळ अवस्थेत खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस उपअधीक्षक सतीश कुलकर्णी, खदान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किशोर शेळके त्यांच्या पथकासह मिश्रा यांच्या निवासस्थानी जाऊन परिसराची तपासणी केली. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी करण्यात आल्याची माहिती आहे.दरम्यान, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

## आकडेवारी काय सांगते?

| तालुका | जि. प. शाळा | महिला शिक्षिका नसलेल्या शाळा |
|---|---|---|
| अचलपूर | १५६ | ३७ |
| अमरावती | १०८ | २६ |
| अंजनगाव | ९८ | १७ |
| भातकुली | १०९ | ३३ |
| चांदुर बा | १२७ | ३८ |
| चांदुर रेल्वे | ७४ | २२ |
| चिखलदरा | १६६ | ९७ |
| धामणगाव | १४२ | ७२ |
| धारणी | ९० | ३८ |
| मोर्शी | १६९ | ७४ |
| नांदगाव खंडे | ११२ | ३७ |
| तिवसा | ७६ | ३३ |
| वरूड | ११७ | ३३ |

# ६२३ शाळांत महिला शिक्षिकाच नाहीत : कसे होणार समुपदेशन ?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१अमरावती**

शाळांतील मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये राज्यात वाढ होत आहे. या घटनांना आळा घालण्यासाठी अल्पवयीन मुला-मुलींचे समुपदेशन होणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील ६२३ शाळांत महिला शिक्षिकाच नाहीत. त्यामुळे मुलींचे समुपदेशन होणार कसे, हा प्रश्न आहे. अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली आहेत. शाळांत विविध समित्या स्थापनेसह तक्रारपेटच्या लावण्याचे सूचना दिल्या आहेत, परंतु शिक्षिकाच नसतील, तर मुलींचे समुपदेशन होणार कसे, असा प्रश्न आहे. त्यामुळे ज्या शाळांत मुली आहेत. तेथे महिला शिक्षकांची नियुक्ती होणे गरजेचे आहे.



जिल्ह्यात जिल्हा परिषदेसह इतर माध्यमांच्या सुमारे २ हजार ८६१ शाळा आहेत. यामध्ये ६२३ शाळांमध्ये महिला शिक्षक कार्यरत नसल्याची बाब समोर आली आहे.अत्याचाराच्या घटनांना लगाम लावण्यासाठी मुला- मुलींचे समुपदेशन होणे गरजेचे आहे.

गुड टच आणि बॅड टचची माहिती मुला-मुलींना देणेही तितकेच गरजेचे आहे. परंतु, अनेक शाळांत महिला शिक्षिकाच नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

> शाळांमध्ये विविध समित्यांची स्थापनेसाठी सूचना दिल्या आहेत. जेथे महिला शिक्षिका नाहीत अशा शाळेत पर्यायी व्यवस्था करून महिला शिक्षिकांच्या माध्यमातून समुपदेशन करण्याबाबत बीईओंना सूचना दिल्या आहेत.
>
> **– बुद्धभूषण सोनोने**
> **शिक्षणाधिकारी**

# तानाजी सावंत आरोग्यमंत्री, त्यांनी चांगल्या डॉक्टरांना दाखवून द्यावे : बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ अमरावती**



तानाजी सावंत आरोग्यमंत्री आहे. त्यांनी चांगल्या डॉक्टरांना दाखवून द्यावे आणि उलटीच्या गोळ्या घ्याव्या, त्यांच्याकडे नसेल तर मी पाठवून देतो, असे म्हणत आमदार बच्चू कडू यांनी खोचक टोला लगावला आहे. तर शेतकऱ्यांची अवकात काढणे एवढे सोपे काम नाही, मंत्री जर अशा पद्धतीने धाडस करत असेल तर शेतकरी त्यांना त्यांची अवकात दाखवेल, असेही कडू यांनी म्हटले आहे. दरम्यान बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, दानवेंनी शेतकऱ्यांना साले म्हटले होते, त्यावेळी शेतकऱ्यांनी त्यांना निवडणुकीत पाडले, त्याच प्रकारे तानाजी सावंत यांना सुद्धा त्या परिणामाला सामोरे जावे लागेल, असा इशारा कडू यांनी दिला आहे.रवी राणा यांच्याविरोधात आम्ही आधीच कोर्टात गेलो आहोत त्यांना नोटीससुद्धा गेली असेल. आग लागल्यावर धूर निघत असतो, त्या धुराकडे लक्ष देण्याची गरज नाही.